गोदातीर 07/02/2025

# बनावट ट्रक नंबर सहित एक जण ताब्यात



**नांदेड (प्रतिनिधी)–** रस्ता सुरक्षा मोहीम अंतर्गत नॅशनल रोड लाईन्स बोन्डार बायपास नांदेड येथे ट्रकला बनावट नंबर असलेल्या एका अशोक लिलॉन्ड कंपनीच्या वाहनासह एकाला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दि. ४ जानेवारी रोजी १०.४५ च्या सुमारास नॅशनल रोड लाईन्स बोंढार बायपासवर बनावट नंबर असलेल्या वाहनाच्या आरोपी अमरजितसिंघ दलबिरसिघ बुटर (वय ३७ वर्ष, रा. दशमेशनगर बाफना ता.जि. नांदेड) या ताबात घेतले. त्याच्याकडे बनावट व नकलीकरण केलेले कागदपत्रे मिळून आले. या प्रकरमी आरोपी हा त्याचा साथीदार अमृतपालसिंघ सिधु याच्या संगणमताने ट्रकचे क्रमांक बदलुन शासनाची फसवणुक करीत असल्याचे लक्षात आले. त्यावरून आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण गु.र.नं. १८/२०२५ कलम कलम ३१८ (२), ३३६, ३३९, ३४० भारतीय न्याय संहीता-२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकाला अटक करण्यात आला आहे. त्यास न्यायालयासमेर हजर केले असता त्यास ५ दिवसांची पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे. इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. त्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. पो. नि.ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रामीण, विश्वदीप रोडे, पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. नांदेड ग्रामीण पोलीस अमंलदार पोहेको गटलेवार, पोकोंजमीर, पोकों धम्मपाल कांबळे यांनी ही कामगिरी केली. धम्मपाल ग्यानोबा कांबळे यांच्या फिर्यादी वरून गुन्हा नोंद केला आहे.